# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
# Savitribai Phule Pune University
(Formerly University of Pune)
**क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ** आयुकाजवळ, गणेशखिंड, पुणे – ४११००७ (भारत)
**Board of Sports & Physical Education** Near. IUCAA, Ganeshkhind, Pune – 411007 (INDIA)
Telephone No. 02025622664, 66 e-mail: directorsports@unipune.ac.in


**Ref. No.** /विक्रीमं/१९० दिनांक: २९.०७.२०२५

प्रति,
मा.प्राचार्य/ मा. संचालक
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
संलग्नित महाविद्यालय/ परिसंस्था
पुणे शहर, पुणे जिल्हा, अहिल्यानगर, नाशिक

विषय: शैक्षणिक वर्ष २०२५–२६ – उत्कृष्ठ क्रीडा महाविद्यालय... निवडीच्या निकषांमध्ये बदल.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणस कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२५–२६ पासून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळातर्फे वार्षिक क्रीडा पारितोषिक वितरण सोहळयात प्रदान करण्यात येणा–या कै. वसंतराव निवृत्ती पवार चषक क्रीडा क्षेत्रात उत्कृष्ठ कामगिरी बजावणा–या महाविद्यालयास देण्यात येतो. या पुरस्काराकरिता महाविद्यालय निवडीच्या निकषांमध्ये क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळामार्फत बदल करण्यात आले आहेत.

शैक्षणिक वर्ष २०२५–२६ पासून उत्कृष्ठ क्रीडा महाविद्यालय निवडीचे निकष पुढीलप्रमाणे राहतील.

महाविद्यालयाची उपरोक्त पुरस्काराकरिता निवड करत असताना खालील प्रमाणे गुणांचे गुणांकन असेल:

| | आशय | | बहाल करावयाचे कमाल गुण |
|---|---|---|---|
| अ. | विविध अंतर विद्यापीठ स्पर्धांमध्ये विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व करणे (प्रति खेळाडू १ गुण) | – | ३० |
| ब. | महाविद्यालयाने अंतर महाविद्यालयीन स्पर्धा आयोजन करणे (प्रत्येक स्पर्धेस ५ गुण किमान ०६ संघ असलेल्या ०६ पेक्षा कमी संघांचा सहभाग असलेल्या स्पर्धा आयोजनास २ गुण) | – | २० |
| क. | विद्यापीठ अंतर विभागीय स्पर्धा आयोजित करणे (प्रत्येक स्पर्धेस १० गुण) | – | २० |
| ड. | महाविद्यालयीन क्रीडा संचालक, प्राध्यापक विद्यापीठाच्या संघासोबत संघव्यवस्थापक, सह संघव्यवस्थापक, मार्गदर्शक म्हणून गेल्यास प्रत्येकी १० गुण (पश्चिम विभागीय, दक्षीण–पश्चिम विभागीय ऑल इंडिया व क्रीडामहोत्सव) | – | २० |
| इ. | अखिल भारतीय अंतर विद्यापीठ स्पर्धेत (प्रथम, द्वितीय, तृतीय) विजेता संघातील अथवा वैयक्ति स्पर्धेतील खेळाडू असल्यास | – | ०५ |
| ई. | जागतिक विद्यापीठ स्पर्धेकरिता निवड झालेला खेळाडू असल्यास | – | ०५ |

व्यतीरिक्त विशेष बाब म्हणून बहाल करण्यात येणारे अतिरिक्त गुण

| | | | |
|---|---|---|---|
| १. | महाविद्यालयातील शा. शि. संचालकांनी स्थानिक विभागीय क्रीडा समितीमध्ये सचिव म्हणून जबाबदारी पार पाडल्यास | — | २० |
| २. | अंतर विद्यापीठ स्पर्धा आयोजित करणे (भारतीय विद्यापीठ संघटना, नवी दिल्ली यांनी स्पर्धा आयोजनाचा मान दिल्यास) | — | २० |
| २. | शा. शि. संचालकांचे चर्चासत्र व क्रीडा शिबिर आयोजित करणे | — | १० |

**विशेष टिप:** चालू शैक्षणिक वर्षात जर महाविद्यालयामार्फत एखादा खेळाडू अंतर महाविद्यालयीन, अंतर विभागीय अथवा अंतर विद्यापीठ स्पर्धेत चुकीच्या पद्धतीने किंवा नियमबाहय खेळविल्याचे निदर्शनास आले व ते सिद्ध झाल्यास अश्या महाविद्यालयाचा त्या शैक्षणिक वर्षाकरिता या पुरस्काराकरिता विचार केला जाणार नाही.

शैक्षणिक वर्षाच्या अखेरीस क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळा कार्यालयामार्फत महाविद्यालयांकडून नामांकन पत्रे मागविण्यात येतील. त्याची पडताळणी क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाच्या उपसमितीमार्फत केल्यानंतर बेस्ट क्रीडा महाविद्यालयास वार्षिक क्रीडा पारितोषिक वितरण समारंभात सन्मानित करण्यात येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

धन्यवाद !

आपला,

(प्रा. डॉ. सुदाम शेळके)
सहायक क्रीडा संचालक (अतिरिक्त कार्यभार)
क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ

प्रत माहितीकरिता: शारीरिक शिक्षण संचालक, संबंधित महाविद्यालय/परिसंस्था